ALORA TRADING COMPANY LIMITED
Registered Office : 1, Floor-Grd, Plot-37/39, Rajyog Building, 1st Carpenter Street,
C.P. Tank, Mumbai - 400 004. • Tel.: 022 66669938
CIN : L70100MH1982PLC296275

**8th December, 2020**

To

| | |
|---|---|
| Listing Compliance Department,<br>**BSE Limited**<br>P.J. Towers, Dalal Street, Fort<br>Mumbai - 400 001<br><br>Scrip Code: 539693 | The Calcutta Stock Exchange Limited<br>7, Lyons Range,<br>Dalhousie<br>Kolkata – 700 001<br><br>Scrip Code: 011189 |

**Sub: Submission of Newspaper Advertisement for Notice of Annual General Meeting, E-voting information and Book Closure**

Dear Sir/Madam,

Please find enclosed herewith a copy of Newspaper Advertisement published on 7th December, 2020 in the "Financial Express" (All Edition) and "The Global Times " (Mumbai Edition) with reference to Annual General Meeting, E- Voting and Book Closure Information.

Kindly take the above on your records.

Thanking you,

**For Alora Trading Company Limited**

**____Sd/-_______**
**Suresh Naskar**
**Managing Director & Compliance Officer**
**DIN: 08537352**

# 'जगात भारी' डिसले गुरुजींचा उद्धव ठाकरे, अजित पवारांनी केला सत्कार



मुंबईः युनेस्को व लंडनस्थित वार्की फाऊंडेशनचा 'ग्लोबल टीचर' पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हा परिषद सोलापूरचे शिक्षक रणजितसिंह डिसले यांचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज सत्कार करण्यात आला. यावेळी रणजितसिंह डिसले यांच्या आई श्रीमती पार्वती, वडील महादेव डिसले यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, शालेय शिक्षण मंत्री ॲड.वर्षा गायकवाड, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, राज्याचे मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, शालेय शिक्षण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव वंदना कृष्णा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे उपस्थित होते.

तत्पूर्वी युनेस्को व लंडनस्थित वार्की फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा 'ग्लोबल टीचर प्राईज' पुरस्कार सोलापूरच्या परितेवाडी शाळेतील शिक्षक रणजितसिंह डिसले यांना मिळाला आहे. 7 कोटी रुपयांचा हा पुरस्कार डिसले यांना जाहीर झाला आहे. लंडनमधील नॅचरल हिस्ट्री म्युझियममध्ये झालेल्या समारंभात सुप्रसिद्ध अभिनेते स्टीफन फ्राय यांनी याची अधिकृत घोषणा केली. असा पुरस्कार मिळणारे रणजितसिंह पहिलेच भारतीय शिक्षक ठरले आहेत.

जगभरातील 140 देशांतील 12 हजारहून अधिक शिक्षकांच्या नामांकनातून अंतिम विजेता म्हणून डिसले गुरुजींची घोषणा करण्यात आली आहे. QR कोडेड पुस्तकांच्या माध्यमातून महाराष्ट्रचं नव्हे तर देशातील शिक्षण क्षेत्रात अभिनव क्रांती केलेल्या कामाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्काराच्या एकूण रक्कमेपैकी 50 टक्के रक्कम अंतिम फेरीतील 9 शिक्षकांना देण्याचे रणजीतसिंह डिसले यांनी जाहीर केले असून, यामुळे 9 देशांतील हजारो मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाईल. डिसले गुरुजींना मिळालेली रक्कम ते टीचर इनोव्हेशन फंडकरता वापरणार असून त्यामुळे शिक्षकांमधील नवनवीन प्रयोग करण्यास चालना मिळेल.

### दहा वर्षे विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कामाचे योग्यवेळी फळ मिळाले- रणजित डिसले

दहा वर्षे विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कामाचे योग्यवेळी फळ मिळाले. हा क्षण म्हणजे आयुष्यातील परमोच्च आनंदाचा क्षण आहे. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने तसेच शिक्षण विभागाने मोलाचे सहकार्य केल्याची भावना ग्लोबल टीचर पुरस्कार विजेते शिक्षक रणजित डिसले यांनी व्यक्त बोलताना केली.



## चिकू उत्पादक पीकविम्याच्या लाभापासून अद्याप वंचित

बोर्डी - मृगबहारासाठी शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार चिकू पीकविमा बागायतदारांनी उतरविला होता. विम्याचा लाभ मिळणार अथवा नाही, याबाबत ३० सप्टेंबरपर्यंत कळविणे बंधनकारक होते. मात्र, दोन महिन्यांचा कालावधी उलटूनही त्याची दखल न घेतल्याने बागायतदारांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पालघरचे जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसाळ यांची भेट घेऊन महाराष्ट्र राज्य चिकू उत्पादक संघाने निवेदन सादर करून तत्काळ विमा मिळण्यासाठी मागणी केली आहे.

पालघर जिल्ह्यात २०२०-२१ ते २२-२३ या तीन वर्षांकरिता चिकू पिकाला प्रधानमंत्री फळपीक विमा योजनेतील पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेचा लाभ मृग बहारासाठी मिळाला आहे. याकरिता ३० जून या अंतिम तारखेस ऑनलाइन पद्धतीने अर्ज दाखल केले होते. पालघर जिल्ह्यात भारतीय कृषी विमा कंपनीकडून हे काम पाहिले जात आहे.

१ जुलै ते ३० सप्टेंबर या कलावधीत १० दिवस ९० टक्के आर्द्रता आणि २० मिमी पाऊस सलग आठ दिवस असल्यास विमा संरक्षित रक्कम ६० हजार आहे, तर पाच दिवस ९० टक्के आर्द्रता आणि २० मिमी पाऊस चार दिवस असल्यास ही रक्कम २७ हजार आहे. एका शेतकऱ्याला चार हेक्टरपर्यंतचा विमा भरण्याची मर्यादा घालून दिली होती. ३० सप्टेंबरअखेर विमा मंजूर झाला अथवा नाही. झाल्यास कोणत्या मंडळात किती टक्के विमा रक्कम मंजूर झाली, हे सांगणे आवश्यक होते. त्याची घोषणा डिसेंबरचा पहिला पंधरवडा उगवला, तरी त्याची घोषणा न झाल्याने शेतकरी अस्वस्थ झाले आहेत. फायटोपथोरा हा बुरशीजन्य रोग आणि आठ-दहा वर्षांपासून डहाणू तालुक्यातील वाढते प्रदूषण इत्यादीमुळे चिकू उत्पादनात होणारी घट होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी विम्याविषयी निवेदनाची दखल घेत, तत्काळ चौकशीचे आदेश दिल्याचे संघाचे अध्यक्ष विनायक बारी यांनी सांगितले.

### सहा तालुक्यांचा समावेश

डहाणू तालुक्यातील डहाणू, चिंचणी, सायवन, कासा, मल्याण या महसुली मंडळांचा समावेश आहे, तर पालघर तालुक्यातील पालघर, बोईसर, तारापुर, मनोर, सफाळे, आगरवाडी, तसेच वसई तालुक्यातील वसई, विरार, माणिकपूर, निर्मळ, आगाशी, मांडवी. वाडा तालुक्यातील वाडा, कंचाड, कोने, कुडूस तर तलासरी तालुक्यातील तलासरी, झरी. विक्रमगड तालुक्यातील विक्रमगड, तलवाडा अशा २५ महसूल मंडळांचा चिकू फळपीक विमा योजनेत समावेश आहे.

# भाज्यांचे दर ६० ते ७० टक्क्यांनी घसरले

## सुके खोबरे महाग तर तेल झाले स्वस्त



ठाणे : भाज्यांचे दर ६० ते ७० टक्क्यांनी उतरले असताना दुसरीकडे फळांचे दर मात्र स्थिर आहेत. तर चक्रीवादळामुळे आवक कमी झाल्याने सुके खोबरे महाग झाले असून गेले अनेक दिवस वाढलेल्या तेलात किलोमागे ५ ते ८ रुपयांनी घसरण झाली असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. दिवाळीपासून तेलाचे दर वाढत होते. प्रत्येक आठवड्यात ५ रुपये वाढत होते. गेल्या आठवड्यात तेल प्रचंड महाग होते. परंतु, या आठवड्याने दिलासा दिला असून तेलाच्या दरात घसरण झाली आहे तर दुसरीकडे सुके खोबरे ३० रुपयांनी महाग झाल्याचे विक्रेते रोहित सावला यांनी सांगितले. डाळिंबाचे दर कमी झाले नसून दुसरीकडे द्राक्ष, अंजीर, स्ट्रॉबेरीचा सिझन सुरू झाला आहे. स्ट्रॉबेरीचा दर गगनाला भिडला आहे, असे फळ विक्रेते दीपक गुप्ता यांनी सांगितले.

गेल्या आठवड्यापेक्षा भाज्यांच्या दरात चांगलीच घसरण झाली आहे. होलसेलमध्ये कोथिंबीर जुडी २०० रुपये शेकडा विकली जातेय. शेवग्याच्या शेंगांचे दर मात्र कमी होत नसल्याचे भाजी विक्रेते राकेश अभंग यांनी सांगितले. भाज्यांचे दर कमी झाल्याने सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे. पालेभाज्या प्रचंड स्वस्त आहेत. आवक वाढल्याने दर घसरले असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. शेवग्याच्या शेंगा किरकोळमध्ये ८० रुपये किलो, तर होलसेलमध्ये ५० ते ६० रुपये किलो आहे. ३०० रु. किलोने विकले जाणारे मटार किरकोळमध्ये ४० रु. किलो तर होलसेलमध्ये २५ ते २६ रु. किलोने मिळत आहेत.

नमुना क्र.७५

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**बृहन्मुंबई विभाग मुंबई**

धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८

**चौकशीची जाहीर नोटीस**

**अर्ज क्रमांक : सधआ-१० /१५३/ २०२०**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : " SHIV PRAVAH PRATISHTHAN "... बाबत.**
**LAXMAN BAJIRAO NEHARKAR ... अर्जदार.**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, **सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१०, बृहन्मुंबई विभाग, मुंबई** हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत** (वर्णन) : **रोख रु. १०००/- (अक्षरी रुपये एक हजार केवळ)**
**ब) स्थावर मिळकत** (वर्णन) : **लागू नाही**


सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०७/१२/२०२० रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधीक्षक (न्याय),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**

# राज्यातील 'जलक्रीडा' सुरू करण्याबाबत लवकरच आदर्श कार्यप्रणाली करणार तयार



मुंबई : राज्यातील जलक्रीडा (वॉटर स्पोर्ट्स) सुरु करण्याबाबत शासन लवकरच आदर्श कार्यप्रणाली (एसओपी) तयार करण्याचे आश्वासन आज राज्याचे वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे तथा मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख यांनी सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यांतील जलक्रिडा व्यावसायिकांच्या शिष्टमंडळास दिले आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगडमधल्या जलक्रिडा व्यावसायिकांनी आज दुपारी राज्याचे बंदरे मंत्री अस्लम शेख यांची त्यांच्या मंत्रालयातील दालनात भेट घेऊन जलक्रीडा सुरु करण्याबाबत निवेदन दिले.अस्लम शेख यांनी शिष्टमंडळास जलक्रीडेसाठी लवकरच आदर्श कार्यप्रणाली तयार करण्याचे व राज्य सरकारचा बंदर विभाग व पर्यटन विभाग यांच्या समन्वयातून जलक्रिडा व्यवसायाशी निगडीत विविध परवानग्या मिळवण्याची प्रक्रिया सोपी व सुलभ करण्याचे आश्वासन दिले. अस्लम शेख म्हणाले की, महाराष्ट्राच्या किनारपट्टी लगतच्या जिल्ह्यांमध्ये पर्यटन व्यवसायाला अनुकूल वातावरण आहे. रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता या क्षेत्रामध्ये आहे. राज्य सरकारचा बंदरे विभाग व पर्यटन विभागाच्या माध्यमातून पर्यटन व्यवसाय वाढावा यासाठी विविध योजना राबवण्यात येणार आहेत.

# घरफोडी करणाऱ्या सराईत दुकलीला अटक

नवी मुंबई : घरफोडी प्रकरणी वाशी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. ते सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर मुंबई व परिसरात चाळीस हुन अधिक गुन्हे दाखल आहेत. त्यांच्याकडून चार गुन्ह्यांची उकल झाली असून त्यामधील ३ लाख ७७ हजार रुपये किमतीचा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे.

घरफोडीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून कसून प्रयत्न सुरु आहेत. त्याकरिता गुन्हे घडणाऱ्या परिसरातले सीसीटीव्ही तपासले जात आहेत. यादरम्यान १०० हुन अधिक ठिकाणच्या सीसी टीव्हीच्या तपासणीत वाशी पोलिसांच्या हाती माहिती लागली होती. दोन व्यक्ती कार मधून परिसरात रेकी करून रात्रीच्या वेळी घरफोडी करत असल्याचे समोर आले होते. त्यानुसार पोलिसांनी रात्रीच्या वेळी सापळा रचला होता. त्याकरिता वरिष्ठ निरीक्षक संजीव धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल, सहायक निरीक्षक सचिन ढगे, उपनिरीक्षक शशिकांत लोंढे, हवालदार शैलेंद्र कदम, संजय भाले, श्रीकांत सावंत आदींचे पथक तयार करण्यात आले होते.

नमुना क्र.७५

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**बृहन्मुंबई विभाग मुंबई**

धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८

**चौकशीची जाहीर नोटीस**

**अर्ज क्रमांक : सधआ-१० /११५६/ २०२०**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : " SHREE MANKESHWAR TRUST "... बाबत.**
**SMT. RANI RAJARAM KORE ... अर्जदार.**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, **सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१०, बृहन्मुंबई विभाग, मुंबई** हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत** (वर्णन) : **रोख रु. ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार केवळ)**
**ब) स्थावर मिळकत** (वर्णन) : **लागू नाही**


सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०७/१२/२०२० रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधीक्षक (न्याय),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**

# वाढवण येथील बंदराविरोधात आमदारांनी दाखवली एकजूट



डहाणू : प्रस्तावित वाढवण बंदराच्या विरोधातील आंदोलनाची धार तीव्र होत असून नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. आता या आंदोलनाला विविध संघटना पाठिंबा देत असतानाच राजकीय पक्षांनीही या आंदोलनातउडी घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. डहाणू विधानसभा मतदारसंघाचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आमदार कॉ. विनोद निकोले आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा विक्रमगड विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनील भुसारा यांनी वाढवण बंदराला विरोध दर्शवला आहे. या आंदोलनाला बळकटी देण्याची भूमिका घेत हे आमदार येत्या हिवाळी अधिवेशनात वाढवण बंदरविरोधी भूमिका मांडणार आहेत. शनिवारी डहाणूच्या शासकीय विश्रामगृहावर बंदरविरोधी काही कार्यकर्त्यांची बैठक झाली.

नमुना क्र.७५

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**बृहन्मुंबई विभाग मुंबई**

धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८

**चौकशीची जाहीर नोटीस**

**अर्ज क्रमांक : सधआ-१० /१११९/ २०२०**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : " PRERNA FOR LIFE FOUNDATION "... बाबत.**
**MISS APARNA OMPRAKASH KAPOOR ... अर्जदार.**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, **सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१०, बृहन्मुंबई विभाग, मुंबई** हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत** (वर्णन) : **रोख रु. ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार केवळ)**
**ब) स्थावर मिळकत** (वर्णन) : **लागू नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०७/१२/२०२० रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधीक्षक (न्याय),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**

नमुना क्र.७५

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**बृहन्मुंबई विभाग मुंबई**

धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८

**चौकशीची जाहीर नोटीस**

**अर्ज क्रमांक : सधआ-१० /१०६०/ २०२०**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : " ANUBHAV PRATISHTHAN "... बाबत.**
**DINESH DNYANESHWAR PUNDE ... अर्जदार.**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, **सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१०, बृहन्मुंबई विभाग, मुंबई** हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत** (वर्णन) : **रोख रु. १०००/- (अक्षरी रुपये पाच हजार केवळ)**
**ब) स्थावर मिळकत** (वर्णन) : **लागू नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०७/१२/२०२० रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधीक्षक (न्याय),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**

नमुना क्र.७५

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**बृहन्मुंबई विभाग मुंबई**

धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८

**चौकशीची जाहीर नोटीस**

**अर्ज क्रमांक : सधआ-१० /११४९/ २०२०**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : " NABA FOUNDATION "... बाबत.**
**MR. SIRAJ ZAFAR MEHDI ... अर्जदार.**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, **सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१०, बृहन्मुंबई विभाग, मुंबई** हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेतः-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत** (वर्णन) : **रोख रु. १०००/- (अक्षरी रुपये एक हजार केवळ)**
**ब) स्थावर मिळकत** (वर्णन) : **लागू नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०७/१२/२०२० रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधीक्षक (न्याय),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**

## अलोरा ट्रेडिंग कंपनी लिमिटेड

(सीआयएनः एल७०१००एमएच१९८२पीएलसी२९६२७५
नोंदणी. कार्यालयः १, तळमजला,प्लॉट क्र.३७/३९, राजयोग ईमारत, कारपेंटर १ला रस्ता, सी,पी टँक, गिरगाव मुंबई -४००००४. दूरध्वनी : ८५९०३०६०७०
ई-मेलः aloratradingcompany@gmail.com
संकेतस्थळः www.aloratrading.com

**सूचना**

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम), बुधवार ३० डिसेंबर २०२० रोजी स.१०.३० वा युनिट क्र.१४, १ ला मजला, गोरागांधी ईमारत, ४७/५१ किकास्ट्रीट, मुंबई-४००००४ येथे एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यवसायावर विचार करण्यासाठी घेण्यात येईल

सूचनेसोबत वार्षिक अहवाल संमत पद्धतीद्वारे सभासदांना पाठविण्यात आला आहे. एजीएमची सूचना पाठ्विण्याचे काम स ०७ डिसेंबर, २०२० रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

सभासद ज्यांनी कट ऑफ दिनांक, २३ डिसेंबर २०२० अनुसार भागधारणा केली आहे ते नशनल सिक्युरीटी डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) च्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळाच्या द्वारे एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या व्यवसायावर दूरस्थ ई-मतदानाच्या द्वारे विचार करता येईल. दूरस्थ ई-मतदानाची सुरवात २७ डिसेंबर २०२० रोजी सकाळी ९:०० वा. होईल आणि २९ डिसेंबर २०२० रोजी सायं. ५.०० वा. समाप्त होईल. त्यानंतर दूरस्थ ई-मतदान प्रणाली एनएसडीएल द्वारे काढून टाकण्यात येईल.

कंपनीच्या एजीएमची सूचना ह्यामध्ये अन्य बाबींसोबत दूरस्थ ई-मतदानाची प्रक्रिया आणि स्वरूप आणि एजीएमच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या मतदान पत्रिकेच्या द्वारे मतदानाचे स्वरूप नमूद करण्यात आले आहे.

सभासद ज्यांनी एजीएमच्या पूर्वी त्यांचे मतदान दूरस्थ ई-मतदानाच्या द्वारे केले आहे ते एजीएमला हजर राहू शकतात परंतु त्यांना परत मतदान करता येणार नाही.

एजीएमच्या कारणासाठी सभासदांची नोंदवही आणि कंपनीची भाग हस्तांतरण नोंदवही २४ डिसेंबर २०२० पासून ३० डिसेंबर २०२० (दोन्ही दिवस धरून) बंद ठेवण्यात येईल.

एजीएमची सूचना कंपनीच्या संकेतस्थळ aloratradingcompany@gmail.com आणि एनएसडीएल चे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com वर देखील उपलब्ध आहे.

कोणीही व्यक्ती ज्यांनी कंपनीचे समभाग अधिग्रहित केले आहेत आणि एजीएमची सूचना पाठविण्यात आल्या नंतर कंपनीचे सभासद झाले आहेत आणि कट ऑफ दिनांक ०४ डिसेंबर २०२० अनुसार भाग धारक झाले आहेत ते त्यांचा यूजर आयडी आणि पासवर्ड evoting@nsdl.co.in किंवा busicomp@vsnl.com वर विनंती करणारे मेल पाठवून प्राप्त करू शकतात. तथापि सभासद जर ह्यापूर्वीच एनएसडीएल मध्ये दूरस्थ ई-मतदानासाठी नोंदणीकृत असल्यास त्यांचे मतदान करण्यासाठी त्यांचा सध्याचा यूजर आयडी आणि पासवर्ड चा वापर करू शकतात. दूरस्थ ई-मतदानाच्या संदर्भात जर कोणतीही समस्या असल्यास, एनएसडीएल, ट्रेड वर्ल्ड, ए विंग ग्री, ४था मजला, कमला मिल्स कंपाऊड, लोअर परेल, मुंबई- ४०००१३ दूरध्वनी क्र. १८००-२२२-९९० (टोल फ्री नं.) वर संपर्क करता येईल किंवा evoting@nsdl.co.in किंवा busicomp@vsnl.com मेल करता येईल.

ई-मतदानाच्या संदर्भात जर कोणतीही समस्या किंवा तक्रार असल्यास तुम्ही www.evotingindia.com वर असलेल्या हेल्प सेक्शनच्या अंतर्गत असलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यू) आणि ई-मतदान पुस्तिकेचा संदर्भ घेता येईल किंवा https://www.evoting.nsdl.com वर तसे मेल करता येईल. तसेच मदतीसाठी १८००-२२२-९९० वर देखील संपर्क साधता येईल.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**सही/-**
**सुरेश नासकर**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएनः ०८५३७५२**

**ठिकाणः मुंबई**
**दिनांकः डिसेंबर ०७, २०२०**

## युवराज हायजिन प्रॉडक्टस लिमिटेड

सीआयएनः एल७४९९९एमएच१९९५पीएलसी२२०२५३
नोंदणी. कार्या.: प्लॉट क्र. ए-६५०, १ ला मजला, टिटिसी इंडस्ट्रीयल इस्टेट, एमआयडीसी, पवने व्हिलेज, महापे, नवी मुंबई – ४००७०५
दूरः ०२२ २७७८ ४९९१/९२/९३/९४ ई-मेलः yhpl@hic.in संकेतस्थळः www.hic.in

**सूचना**

सभासदांना ह्याद्वारे कळविण्यात येत आहे की युवराज हायजिन प्रॉडक्टस लिमिटेड ह्या सभासदांची २५ वी (पंचविसावी) वार्षिक सर्व साधारण सभा व्हिडियो कॉन्फरसिंग (व्हिसी)/ अन्य ऑडियो व्हिज्युअल माध्यम (ओएव्हीएम) च्या द्वारे २५ व्या एजीएमची सूचना जी दरम्यानच्या काळामध्ये सभासदांना ई-मेल द्वारे पाठविण्यात आली आहे, त्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या विषयावर विचार करण्यासाठी मंगळवार, २९ डिसेंबर २०२० रोजी दुपारी १२.०० वा. आयोजित करण्यात आली आहे.

कंपनी व्यवहार मंत्रालय (एमसीए) द्वारे जारी करण्यात आलेल्या सामान्य परिपत्रक क्रमांक २०/२०२० दिनांकित ५ मे २०२०, १४/२०२० दिनांकित ८ एप्रिल, २०२०, १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल २०२० आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सेबी) द्वारे जारी करण्यात आलेले परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी.२०२०/७९ दिनांकित १२ मे २०२० (ह्यानंतर एकत्रिपणे 'परिपत्रके' असा संदर्भ) च्या मान्यतेच्या अनुसार सार्वजनिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय व्हिसी/ओएव्हिएमद्वारे एजीएमचे आयोजन करण्याची परवानगी देण्यात येत आहे. उपरोक्त नमूद परिपत्रके, कंपनी कायदा, २०१३ ("कायदा") आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझरस रिक्वायरमेंटस) नियमावली २०१५ (लिस्टिंग रिक्वायरमेंटस) च्या अनुसार व्हिसी/ओएव्हिएमद्वारे कंपनीची एजीएम आयोजित करण्यात येणार आहे.

सूचना आणि ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी वार्षिक अहवाल अशा सभासदांना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठविण्याचे काम सोमवार ७ डिसेंबर २०२० रोजी पूर्ण झाले आहे ज्यांच्या ई-मेल आयडीची नोंद कंपनी/ डिपॉझिटरी पार्टीसिपंटस/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफार एजंटस ह्यांच्याकडे शुक्रवार ४ डिसेंबर २०२० अनुसार करण्यात आली आहे.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ च्या अनुसार २५ व्या एजीएमच्या निमित्ताने सभासदांची नोंदवही आणि कंपनीची भाग हस्तांतरण नोंद वही बुधवार २३ डिसेंबर २०२० पासून मंगळवार २९ डिसेंबर २०२० (दोन्ही दिवस धरून) पर्यंत बंद ठेवण्यात येईल.

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ च्या नियम ४४ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १०८ च्या अनुसार कंपनी, त्यांच्या समभाग धारकांना दूरस्थ ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देणार आहे. कंपनीने या कारणासाठी सीडीएसएल ची अधिकृत संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. एजीएमच्या दिवशी देखील त्याठिकाणी ई-मतदान प्रणालीचा वापर करून मतदान करण्याची सुविधा सीडीएसएल द्वारे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सर्व सभासदांना याद्वारे कळविण्यात येत आहे कीः

२५ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या व्यवसायावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने विचार करण्यात येईल.

इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे मतदानासाठी पात्रता निश्चित करण्यासाठी कट ऑफ दिनांक मंगळवार २२ डिसेंबर २०२० निश्चित करण्यात आला आहे. कट ऑफ दिनांकाच्या अनुसार ज्या व्यक्तींची नावे सभासदांच्या नोंदवही किंवा लाभार्थी मालकांच्या नोंद वही मध्ये आलेली आहेत, ते दूरस्थ ई-मतदान किंवा एजीएमच्या ठिकाणी ई-मतदानाच्या द्वारे मतदान करण्यास पात्र असतील.

ई-मतदान पोर्टल शनिवार २६ डिसेंबर २०२० (भाप्रवे स. ०९:०० वा) पासून सुरु होईल आणि सोमवार, २८ डिसेंबर २०२० (भाप्रवे सायं. ०५:०० वा) बंद करण्यात येईल. त्यानंतर सीडीएसएल द्वारे दूरस्थ ई-मतदान प्रणाली अकार्यक्षम करण्यात येईल आणि नमूद वेळेच्या नंतर मतदान करता येणार नाही.

जर व्यक्तीने सूचना पाठविण्यात आल्या नंतर परंतु कट ऑफ दिनांक म्हणजेच डिसेंबर २१, २०२० पूर्वी कंपनीचे समभाग अधिग्रहित केली आहेत आणि कंपनीचे सभासद झाले असल्यास त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करण्यासाठी helpdesk.evoting@cdslindia.com वर विनंती करणारे मेल पाठवून यूजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करता येईल.

सभासद ज्यांनी त्यांचे मतदान सभेच्या पूर्वी नोंदवले आहे ते सभेला हजर राहू शकतात परंतु सभेच्या ठिकाणी परत मतदान करण्यास पात्र नसतील.

प्रत्यक्ष स्वरूपात आणि अप्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा करणाऱ्या आणि सभासद ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद केलेली नाही अशा सभासदांसाठी दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमच्या दरम्यान मतदान करण्याची प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आली आहे. मे. मनीष घिया अँड असोसिएटस, कार्यरत कंपनी सचिव ह्यांची मतदान प्रक्रिया प्रामाणिक आणि पारदर्शी पद्धतीने पूर्ण होण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. छाननीकर्त्यांच्या अहवालासोबत निकाल विहित कालावधीमध्ये कंपनीच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल आणि त्यानंतर बीएसईला देखील कळविण्यात येईल.

ई-मतदानाच्या संदर्भात तपशीलवार सूचना २५ व्या एजीएमच्या सुचानेमधील "ई-मतदान प्रक्रिया" मध्ये देण्यात आल्या आहेत. ई-मतदानाच्या संदर्भात कोणतीही समस्या किंवा तक्रार असल्यास www.evotingindia.com वर असलेल्या फ्रिकवेंटली आस्क्ड क्वेश्चन्स, (एफएक्यू) आणि ई-मतदान पुस्तिकेचा संदर्भ घेता येईल किंवा ई-मेल helpdesk.evoting@cdslindia.com वर मेल करावे, श्री. राकेश दळवी ह्यांच्याशी १८००२२५५३३ वर संपर्क करावा किंवा yhpl@hic.in वर देखील मेल करावे.

युवराज हायजिन
प्रॉडक्टस लिमिटेड, करीता
सही/-
विशाल कंपनी
व्यवस्थपकिय संचालक
डीआयएनः ०३३३५७१७

ठिकाणः नवी मुंबई
दिनांकः डिसेंबर ०७, २०२०